# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र. २३-२२ | दिनांक २७/०१/२०२२

# सायकल राईडसाठी गेलेल्या पोलीसांनी घडवून आणली माय-लेकरांची भेट.

२६ जानेवारी २०२२ रोजी प्रजासत्ताकदिनी मास्क व हेल्मेटचा वापर बाबत जागृकता वाढावी या हेतूने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), श्री. विनायक नरळे, सहा. पोलीस आयुक्त (मुख्यालय), पोनि. राहूलकुमार पाटील, पोउपनि. उज्वल आरके, पोउपनि सुहेल पठाण, पोहवा. शंकर उथळे, पो.अं. सोमनाथ चौधरी, प्रविण बंगाळे अशा पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी मिरारोड ते गेटवे ऑफ इंडिया अशी सायकल राईड केली.

गेटवे ऑफ इंडिया येथे सायकल राईड संपल्यानंतर सदरील पोलीस हे चर्चगेट येथून मिरारोड येथे येण्यासाठी लोकल रेल्वेने प्रवास करित असतांना अंधेरी रेल्वे स्टेशन येथून दोन महिला सदरील डब्यामध्ये भांबावलेल्या अवस्थेत बसल्या. त्यावेळी सायकल राईडसाठी गेलेल्या पोउपनि. श्री उल्वल आरके यांनी विचारपूस केली असता त्या महिलेने सांगितले की, माझे नाव श्रीमती सोनी धर्मेंद्र सिंग असून तिचे तिन मुले, एक मुलगी व तिची सासुबाई असे अंधेरी रेल्वे स्टेशनवरून विरारला जाण्यासाठी लोकलमध्ये बसत असतांना तिने अगोदर तिचे चारही मुलांना रेल्वेमध्ये बसविले मात्र गर्दी असल्यामुळे ती व तिचेसोबत असलेली सासुबाई हया दोघी सदरील रेल्वेमध्ये बसू शकल्या नाही व विरारला जाणारी रेल्वे निघून गेली. सदरील दोन्ही महिलांना रेल्वेबाबत पुर्ण माहिती नसल्यामुळे त्या घाबरुन रडत होत्या. त्यावेळी पोउपनी उज्वल आरके यांनी सदरील परिस्थिती तात्काळ लक्षात घेवून प्रसंगावधान साधुन रेल्वेच्या नियंत्रण कक्षास कळविले व रेल्वे पोलीसांशी मोबाईलद्वारे संपर्क साधून सदर घटनेची माहिती दिली. त्याआधारे रेल्वे पोलीसांनी तात्काळ प्रतिसाद देवून सर्व रेल्वे स्थानकांवरील पोलीसांना कळविले असता ३ मुले व १ मुलगी असे विना पालकांशिवाय विरारला जाणाऱ्या लोकलमध्ये बोरीवली येथे मिळून आल्याने मुलगा नामे अनुराग सिंग वय-११, अनुपम सिंग वय-८, अनुजसिंग वय-६ व मुलगी प्रगती उपेंद्र सिंग-५ यांना त्यांची आई श्रीमती सोनी धर्मेंद्र सिंग यांच्याशी भेट घालून दिल्याने त्यांनी पोलीसांचे आभार मानले. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोउपनी उज्वल आरके यांनी रेल्वे व पोलीस यंत्रणांना तात्काळ संपर्क केल्याने सदर महिला व त्यांचे मुलांची तात्काळ भेट होवू शकली आहे. पोउपनी उज्वल आरके यांचे वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी खास कौतूक केले आहे.



